




दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे








वर्ष ५ । अंक १७० । मंगळवार २४ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## गॅस रिफिलिंगच मोठं रॅकेट उघड; चार आरोपी जेरबंद

### गॅस टंचाईत काळा बाजार उघड । तीन टँकरमधून अवैध रिफिलिंग । दोन कोटींचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील चास कामरगाव परिसरात गॅस टंचाईच्या काळात सुरू असलेल्या अवैध गॅस रिफिलिंगच मोठं रॅकेट स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला आहे या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली असून तब्बल दोन कोटी एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले असून पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हॉटेल परिसरात छापा टाकले असता तीन एचपी गॅस टँकर मधून व्यावसायिक सिलेंडरमध्ये बेकायदेशी रित्या गॅस भरला जात असल्याचे समोर आले. या धोकादायक प्रकारामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता होती. आरोपींकडे कोणतेही कायदेशीर परवाना नसताना ते आर्थिक फायद्यासाठी हा व्यवसाय करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

■ पान ४ वर

## बालिकेवर अत्याचार प्रकरणी नराधमास आजन्म कारावास

### विशेष पोक्सो न्यायालयाचा निकाल । काटवन खंडोबा परिसरात दहा वर्षांपूर्वी घडली होती घटना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** घरात खेळणाऱ्या बालिकेवर खाऊचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी नराधम तरुणास जिल्हा न्यायालयाने आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. युसूफ हमीद कुरेशी (वय ३४ वर्षे, रा. गाझीनगर, काटवन खंडोबा रोड, नगर) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे.

दहा वर्षांपूर्वी, ऑगस्ट २०१५ मध्ये ही संतापजनक घटना घडली होती. पीडित बालिका तिच्या राहत्या घरी खेळत असताना नराधम युसूफने तिला खाऊचे आमिष दाखवून सप्तपदी मंगल कार्यालय परिसरात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. आरोपी हा या मंगल कार्यालयात रखवालदार म्हणून काम पाहत होता

या घटनेनंतर पीडित बालिकेच्या आईने कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्तयाचा पास तत्कालीन पोलीस निरीक्षक मनोज जे. महाजन यांनी करून आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

सदरचा खटला नगर येथील विशेष पोक्सो तसेच जिल्हा न्यायाधीश कोर्ट नं. ६ यांच्यासमोर ■ पान ४ वर

### न्यायालयाने नोंदविले निरीक्षण

निकाल देतेवेळी न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, पीडित बालिकेचा जन्म हा १५ ऑगस्ट म्हणजेच स्वांतत्र्यदिनी झाला. स्वातंत्र्य म्हणज एका बालिकेसाठी सुरक्षितता, निडरपण, खेळण्याचा हक्क आणि भीतीविरहीत आयुष्य जगण्याचा अधिकार होय. मात्र आरोपीच्या कृत्यामुळे केवळ तिच्यावर शारीरिक अत्याचार झाला नाही, तर तिचे स्वातंत्र्य आणि सुरक्षिततेची भावना निर्दयपण हिरावली गेली आहे.

### असे आहे शिक्षेचे स्वरूप

नराधमास भादंवि कायद्याचे कलम ३७६ अन्वये आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा व दहा हजार रुपये दंड, दंड व न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा, ३६३ अन्वये एक वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा व तीन हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा, ३७७ अन्वये पाच वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा व पाच हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा, ३५४ () अन्वये तीन वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा व तीन हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व ५०६ अन्वये एक वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा व एक हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावासाची शिक्षा व पोक्सो कलम ४.६, ८ व १२ अन्वये दोषी धरून मरेपर्यंत सश्रम कारावासाची शिक्षेसह एकूण रुपये २२ हजार दंड ठोठावून दंडाची रक्कम पीडित मुलीच देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. सर्व शिक्षा एकत्रित भोगायच्या आहेत.

## केडगाव अवैध गॅस रिफिलिंगची चौकशी करून दोषींवर कारवाई करा – आमदार काशिनाथ दाते

### आमदार दातेंची विधानसभेत मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न क्रमांक २३२२१ अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील केडगाव बायपास परिसरात उघडकीस आलेल्या अवैध एलपीजी गॅस रिफिलिंग प्रकरणावर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी विधानसभेत आवाज उठवत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली.

आमदार दाते म्हणाले केडगाव बायपासलगत अनुराग टायरच्या गोदामामध्ये चाकणवरून अहिल्यानगर, संभाजीनगरला गॅस वाहतूक करणाऱ्या गॅस टँकरमधून अनधिकृतपणे एलपीजी गॅस रिफिलिंग केले जात होते.

हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू असल्याचे समोर आले असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस अधिकाऱ्यांच्या कारवाईदरम्यान रात्री उशिरा छापा टाकून रंगेहाथ चार आरोपींना अटक करण्यात आली, तर दोन आरोपी फरार असल्याचे निदर्शनास आले. मात्र अटक झालेल्या आरोपींना जामीन मिळाल्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर आमदार दाते यांनी सरकारला थेट प्रश्न विचारत, "अटक केलेल्या आरोपींना मिळालेला जामीन रद्द करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार का?" असा सवाल उपस्थित केला. तसेच, हा अवैध प्रकार संबंधित कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने सुरू असताना स्थानिक पोलिसांची जबाबदारी निश्चित करून त्यांची चौकशी करण्यात येणार का आणि दोषी आढळल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली जाणार का, असेही त्यांनी स्पष्टपणे विचारले.

यावेळी राज्य शासनाच्या वतीने उत्तर देताना सांगण्यात आले की, पोलिसांनीच या प्रकरणाचा छडा लावून कारवाई केली असून संबंधित ठिकाणी छापे टाकून आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, इंधन चोरी सारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर ■ पान ४ वर

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभागातील कनिष्ठ अभियंता

## सचिन दिनकर विरोधात लाचप्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभागातील कनिष्ठ अभियंता (अतिरिक्त पदभार उपअभियंता) सचिन सुरेश दिनकर (वय ४१) यांच्याविरुद्ध ६५०० रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे.

कोतवाली पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई २३ मार्च रोजी सापळा रचून करण्यात आली. तक्रारदार हे शासकीय कंत्राटदार असून देहरे (ता. अहिल्यानगर) येथील स्मशानभूमी सुशोभीकरणाचे काम त्यांनी पूर्ण केले होते. या कामाचे बिल मंजूर करून पुढे पाठविण्यासाठी दिनकर यांनी एकूण बिलाच्या २ टक्के प्रमाणे १६,५०० रुपयांची लाच मागितल्याचे समोर आले आहे. यापूर्वी १०,००० रुपये स्वीकारल्याची कबुली देत उर्वरित ६,५०० रुपयांची मागणी त्यांनी केली होती. २३ मार्च रोजी पडताळणीनंतर सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार लाच रक्कम देत असताना दिनकर यांना संशय आल्याने त्यांनी दुचाकीवरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, सापळा पथकाने पंचांच्या मदतीने त्यांना ताब्यात घेतले. संशय आल्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष लाच रक्कम स्वीकारली नाही, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या प्रकरणी कोतवाली ■ पान ४ वर

राजकारणविरहित सच्चा माणूस

## डॉ. सुजय विखे यांनी बहरीनमध्ये अडकलेल्या कुटुंबाला सुखरूप आणले मायदेशी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आखाती देशात अडकलेल्या एका कुटुंबाला सुरक्षित मायदेशी आणण्यासाठी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील यांनी दाखवलेल्या तत्परतेचे जिल्हाभर कौतुक होत आहे. त्यांच्या संवेदनशील व मानवी दृष्टिकोनामुळे एका कुटुंबाला दिलासा मिळाला असून राजकारणापलीकडचा माणूस अशी त्यांची ओळख अधिक ठळक झाली आहे.

मूळचे अहिल्यानगर येथील सत्यजित जठार व त्यांचे कुटुंब बहरीनमध्ये अडकले होते. २८ फेब्रुवारी रोजी इराणकडून हल्ले सुरू झाल्यानंतर बहरीन देशाची एअरस्पेस बंद करण्यात आली. याच दरम्यान जठार कुटुंबातील मुलगा साहस जठार याचा पासपोर्ट नूतनीकरण झाला नसल्याने अडथळा आला होता. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाला बहरीनमध्येच थांबावे लागले व त्यांच्या समोर मोठी अडचण निर्माण झाली.



या अडचणीबाबत जठार कुटुंबाने नगरसेवक धनंजय जाधव यांच्याशी संपर्क साधला. धनंजय जाधव यांनी तात्काळ डॉ. सुजय विखे पाटील यांची भेट घेऊन संपूर्ण परिस्थितीची माहिती दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉ. विखे यांनी त्वरित दिल्लीतील यंत्रणा कामाला लावली आणि संबंधित पासपोर्ट बहरीनपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था केली.

पासपोर्ट मिळाल्यानंतर जठार कुटुंब सुखरूप ■ पान ४ वर

## अहिल्यानगर मनपाकडून 'टीबी मुक्त भारत' अभियानाचा शुभारंभ; जनजागृती रॅलीने दिला संदेश

### जागतिक क्षयरोग दिनानिमित्त १०० दिवसांची विशेष मोहीम सुरू




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने जागतिक क्षयरोग दिनानिमित्त 'टीबी मुक्त भारत' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या निमित्ताने शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली असून शालेय विद्यार्थी, नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी, आशा सेविका व आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

या अभियानाचा शुभारंभ महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, डॉ. अभिजीत पाठक, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. साहिल शेख, योगेश औटी यांच्यासह आरोग्य कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'टीबी मुक्त भारत' करण्यासाठी १०० दिवसांची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत शहरातील विविध भागात जाऊन गर्दीच्या ठिकाणी आयुष्यमान आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाईल. या शिबिरांमध्ये नागरिकांची तपासणी करण्यात येणार असून संभाव्य रुग्णांची लवकर ओळख करून त्यांच्यावर ■ पान ४ वर

## रसिक ग्रुपच्या उपक्रमांमुळे नगरची वाटचाल सांस्कृतिक शहराकडे – विशेष पोलीस महानिरीक्षक कराळे

### रसिक ग्रुपच्या रसिक गौरव पुरस्कारांचे समारंभपूर्वक उत्साहात वितरण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** विविध उपक्रमांनी रसिक ग्रुप आपली वैभवशाली परंपरेचे जतन करत आहे. या उपक्रमांमुळे नगर शहराचे सांस्कृतिक वैभव वाढत असल्याने नगरची वाटचाल सांस्कृतिक शहराकडे होत आहे. नागरिकांना सुखावणारे उपक्रमांचे आयोजन कायम करत रहा. रसिकोत्स्व सारख्या चांगल्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होताना समाधान वाटते. त्यामुळेच पुढील वर्षीचा रौप्यमहोत्सवी सोहळ्यासही आवर्जून उपस्थित राहू, अशी ग्वाही विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी दिली.

नुकत्याच गुढीपाडव्यानिमित्त झालेल्या रसिकोत्स्व सोहळ्यात विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे व कायनेटिक कंपनीचे संचालक अजिंक्य फिरोदिया यांच्या हस्ते व उद्योजक नरेंद्र फिरोदिया, उद्योजक दीपक चांदोरकर व अश्विन गांधी, श्वेता गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत रसिक ग्रुपच्या वतीने देण्यात येणारे रसिक गौरव पुरस्कारांचे समारंभपूर्वक वितरण झाले. या कार्यक्रमात शांतीकुमार फिरोदिया स्मृती रसिक गौरव पुरस्कार पुणे येथील लघु शिल्पकार हेमंत चिंचवले यांना प्रदान करण्यात आला. तसेच क्रिकेटपटू बाबा चांदोरकर स्मृती गौरव पुरस्कार इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांना तर प्रदीप गांधी स्मृती रसिक गौरव पुरस्कार सीए रमेश फिरोदिया यांना प्रदान करण्यात आला. सीए रमेश फिरोदिया यांच्या वतीने अनिल पोखरणा यांनी पुरस्कार स्वीकारला.

यावेळी , शशिकांत गुळवे, , चैतन्य शिंदे, कैलास गुरव, अनिल पोखरणा, सतीश बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, सुनील मुनोत, नगरसेवक ऋग्वेद गंधे, श्रीनिवास न्यायपेल्ली, मंगल भालेराव, जयंती भालेराव, कार्तिक पूनागोंटीवार, बाळासाहेब विश्वासराव, डॉ.गोपाल बहुरूपी, विजय इंगळे, श्रीहरी टिपूगडे, जितेंद्र बिहाणी,व रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलुलकर, सर्व सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर व हजारो प्रेक्षक उपस्थित होते.

अजिंक्य फिरोदिया म्हणाले, रसिक ग्रुप एवढ्या मोठ्या सोहळ्याचे आयोजन करून नगरच्या नागरिकांना अनोखी मेजवानी दिली आहे. या सोहळ्यात दरवर्षी कायनेटिक कंपनी सहभागी होत असल्याचा आनंद आम्हला होत आहे. कायनेटिक कंपनीवर नगरकरांनी कायमच प्रेम केले आहे.

प्रास्ताविकात जयंत येलूलकर म्हणाले, आपले नगर शहर सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जावे यासाठी गेल्या २४ वर्षांपासून रसिक ग्रुप सांस्कृतिक वारसा जपत काम करत आहे. या कामात अनेकांची साथ व पाठबळ मिळत आहे. नगरमध्ये अनेक हिरे आहेत जे आपल्या कार्यकर्तृत्वाने नगरचे नावलौकिक उंचावत आहेत. अशांचा गौरव करून त्यांना अधिक प्रोत्साहन देण्यासाठी व इतरांनी त्यांच्यापासून प्रेरणा घ्यावी यासाठी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### घोटन येथिल कालिकादेवीच्या यात्रेस गुरुवारी प्रारंभ

खरवंडी कासार - सोमवंशी क्षत्रिय कासार



समाज्याचे कुलदैवत असणाऱ्या घोटन येथिल कालीका देवीचा यात्रा उत्सव येत्या गुरुवार व शुक्रवारी होणार असुन सर्व भावीकानी यात्रा उत्सव सहभागी होऊन देवीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आव्हान घोटन येथिल कालीका देवी संस्थानच अध्यक्ष शिवाजीराव गोसावी यांनी केले आहे सोमवंशी क्षत्रिय कासार समाज्याचे निनगुर डिग्रस घोटन येथे कालीका देवीची शक्ती पिठ असुन महाराष्ट्र भरातून कासार समाज आपल्या कुलदैवतेचे दर्शन घेण्यासाठी यात्रेच्या निमीत्याने घोटन येथे येत असतो या मंदीराच्या ठिकाणी विविध विकास कामे चालु असुन भावीका च्या सहकार्यामुळे या देवस्तान ची मोठ्या प्रमाणात विकासाकडे वाटचाल चालु असुन येणाऱ्या भाविकाना जास्तीत जास्त चांगली सेवा देण्याचा विश्वस्त मंडळाचा प्रयत्न असतो. गुरुवार दि २६ मार्चला ला यात्रेला प्रारंभ होत असून या कालिका देवीचे यात्रेमध्ये सकाळी पूजा सप्तशती पाठ हवन होमाची पूर्ण आहुती देवीचा अभिषेक आरती त्यानंतर चहा व महाप्रसाद कार्यक्रम असणार आहे दुपारी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अभिषेक तर तीन वाजता श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र शेवगाव पाथर्डी येथील सेवेकरांचे सप्तशिती पाठ होऊन आरती नैवेद्य रात्री सात वाजता आराधना महाप्रसाद व्होईल तर रात्री कासार समाज महिला मंडळाचा सांस्कृतीक कार्यक्रम व्होईल तर शुक्रवारी सकाळी अभिषक दुपारी कालीका महिला भजनी मंडळ अहिल्यानगर यांचा भजनाचा कार्यक्रम व दुपारी दोन वाजता शिवशाहीर अक्षय डांगरे यांचा पोवड्या चा व गोंधळाचा कार्यक्रम व्होईल दुपारी तिन वाजता कासार समाज्याची व संस्थान ची जनरल मिटींग व्होऊन मान्यवराचे मार्गदर्शन व सत्तकार होतील सायंकाळी ग्रामदैवत म्हसोबा ची पुजा व दर्शन तर सात वाजता सामुदाईक महाप्रसाद होऊन रात्री कालीका देवीची पालखी सवादय छबीना मिरवणूक व्होईल या यात्रे साठी पैठण ते घोटन . शेवगाव ते घोटन व बालमटाकळी ते घोटन येथुन भावीक पायी दिंडीने येवून यात्रेत सहभागी होणार आहेत राम नवमी व कालिकामाता प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रम विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन कासार समाज बाधवानी या उत्सहात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे संस्थांनचे अध्यक्ष शिवाजीराव गोसावी उपध्यक्ष रविशेट पाथरकर सचीव अशोकराव पाथरकर विश्वस्त विकास सातपुते अभय थिटे अनिल गोसावी कैलास गोसावी रमेश काळे प्रशांत कोळपकर सुनिल रासने कृष्णनाथ अंदुरे सदाशिव यंडे संतोष यंडे योगेश रासणे बाळकृष्ण हुलचुते बकंट व्यवहारे पाडुरंग सातपुते प्रशांत कोळपकर अनिल रासणे राजेंद्र गोसावी अप्पा रासणे गणेश गोसावी आदीनी केले आहे.

### आंबेडकरी चळवळीचा आवाज दाबण्याचे काम जिल्हा व पोलीस प्रशासन करत आहे - साळवे

अहिल्यानगर- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित नियोजन बैठकीत जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. आंबेडकरी चळवळीचा आवाज दाबण्याचे काम प्रशासनाकडून होत असल्याचा आरोप बैठकीचे अध्यक्ष व माजी नगरसेवक अजय साळवे यांनी केला. सकल आंबेडकरी समाजाच्या वतीने दादासाहेब रुपवते विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात ही बैठक पार पडली. बैठकीच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून बुद्धवंदना घेण्यात आली. यावेळी जेष्ठ मार्गदर्शक अशोक गायकवाड, प्रा. जयंत गायकवाड, सुनील क्षेत्रे,प्रा. विलास साठे, प्रा. जाधव,सुनील साळवे,गौतम म्हस्के, सुमेध गायकवाड,अमित काळे, महेश भोसले, विनोद गायकवाड, किरण दाभाडे, सनी माघाडे, संजीवन साळवे सर, अजय भिंगारदिवे सर, राजूभाऊ शिरसाठ, आशुतोष अजय भिंगारदिवे, मुन्ना भिंगारदिवे, संजय भिंगारदिवे, महेश शेळके,रमेश भिंगारदिवे, गौरव भाकरे, प्रेम साळवे, संजय साळवे, आमन काते,विशाल साळवे, सिद्धार्थ पगारे, राहुल साळवे, वृषाल साळवे, वैभव डाके, तेजस गायकवाड, अजय गायकवाड, शिवम झेंडे,पंडित, ओंकार गांगर्डे, किरण पवार, तुषार बोराडे, र आदी कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटना व आंबेडकरी चळवळीतील विविध गटांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीरामनवमीनिमित्त २६ रोजी ‘गीतरामायण’ कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्रीरामनवमीच्या पावन पर्वानिमित्त शहरात सांस्कृतिक आणि भक्तिमय वातावरण निर्माण करण्यासाठी यावर्षीही ‘गीतरामायण’ या अजरामर कलाकृतीचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात हा कार्यक्रम रंगणार असून, भाविक व रसिक श्रोत्यांसाठी हा एक अनमोल संगीतसोहळा ठरणार आहे. कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.




महाकवी ग.दि. माडगुळकर आणि स्वरतीर्थ सुधीर फडके यांच्या ‘गीतरामायण’ या अजरामर कलाकृतीला मराठी साहित्यात आणि संगीतविश्वात विशेष स्थान आहे. प्रभू श्रीरामांच्या जीवनावर आधारित या गीतमालिकेतून आदर्श, संस्कार आणि भक्तीचा संदेश दिला जातो. याच भावनेतून श्री. प्रसाद सुशिला सोन्याबापू शेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम सादर होणार असून, त्यांच्या सादरीकरणातून श्रोत्यांना रामकथेचा अद्वितीय अनुभव घेता येणार आहे.

या कार्यक्रमात सहगायिका म्हणून सौ. श्रद्धा बाजारे-शेटे, डॉ. श्रद्धा शेटे-बेल्हेकर आणि सौ. रेणुका पवार आपला सुरेल आवाज देणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन सौ. वीणा दिघे करणार असून, संगीताची बाज अधिक समृद्ध करण्यासाठी विविध वादकांची साथ लाभणार आहे. सिंथेसायझरवर श्री. सत्यजीत सराफ, तबल्यावर श्री. हर्षद भावे व श्री. प्रसाद सुवर्णपाठकी, संवादिनीवर श्री. मकरंद खरवंडीकर, तसेच तालवाद्यावर श्री. कुलदीप चव्हाण हे आपली कला सादर करणार आहेत.

या कार्यक्रमाचे एक विशेष आणि मानाचे आकर्षण म्हणजे पुणे येथील ज्येष्ठ व्हायोलिन वादक पं. रमाकांत परांजपे यांचे सादरीकरण होय. भारतीय संगीतविश्वातील दिग्गज कलाकारांसोबत त्यांनी दीर्घकाळ साथ दिली असून, भारताची गानकोकिळा लता मंगेशकर आणि किराणा घराण्याचे महान गायक पं. भीमसेन जोशी यांच्यासह अनेक नामवंत कलाकारांच्या कार्यक्रमात त्यांनी आपल्या सुरेल व्हायोलिनच्या माध्यमातून रंगत वाढवली आहे. त्यांच्या समृद्ध अनुभवामुळे आणि प्रभावी सादरीकरणामुळे ‘गीतरामायण’ या कार्यक्रमाला एक वेगळेच उंचीवर नेणारे कलात्मक परिमाण लाभणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या वर्षीच्या कार्यक्रमासाठी विविध सन्माननीय प्रायोजकांचा देखील सहभाग लाभला आहे. प्रोॲक्टिव्ह लाइफ स्टाईल, आरोग्यसदन हॉस्पिटल, बीपीई, बजाज पॉवर इक्विपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि इंडोस्कल्प या संस्थांनी या उपक्रमाला सहकार्य केले असून, त्यांच्या पाठबळामुळे कार्यक्रम अधिक भव्य आणि दर्जेदार होणार आहे.

श्रीरामनवमीच्या दिवशी ‘अवघ्या आशा श्रीरामार्पण’ या भावनेतून साकार होणारा हा गीतरामायण सोहळा भक्ती, संस्कृती आणि संगीत यांचा सुंदर संगम घडवणार आहे. अहिल्यानगरातील भाविक, रसिक व संगीतप्रेमी नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होऊन श्रीराम हनुमान भेटीचा आध्यात्मिक अनुभव घ्यावा , असे आवाहन आयोजक श्री. प्रसाद शेटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८५०२५९८६० आणि ८४४६९२५४४३ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# मी आणि अध्यात्म यामधील इगो हा अडथळा - सतीश फडके

## भगवान महावीर व्याख्यानमाला - पुष्प दुसरे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी





**अहिल्यानगर–** विज्ञान, श्रध्दा, अंधश्रद्धा, कर्मकांड, धार्मिक आणि अध्यात्मिक हे वेगवेगळे विषय आहेत. मी आणि अध्यात्म यामधील इगो हा मोठा अडथळा आहे, असे मत श्री. सतीश फडके यांनी व्यक्त केले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू.श्री.आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे व्दितीय पुष्प गुंफताना तुमचे आमचे अध्यात्म या विषयावर ते बोलत होते. नवकार महामंत्राने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

सपना कटारिया यांनी स्वागत केले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी वक्त्याचा परिचय करून दिला. श्रीमती इमरतबाई मुनोत आणि राहुल मुनोत (नेवासावाला) यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सिमा मुनोत, सुरेश कटारिया आदी उपस्थित होते. संतोष गांधी यांनी आभार मानले.

विजयकुमारजी मुनोत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानमालेच्या मुख्य प्रायोजक श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) आहेत.

श्री.फडके पुढे म्हणाले, विज्ञान, श्रध्दा, अंधश्रद्धा, कर्मकांड, धार्मिकता या पलिकडे अध्यात्मिक व्यक्ती असते. धार्मिकतेच्या आणि श्रध्देच्या नावाखाली कर्मकांड करणारे अध्यात्मिक नव्हेत. काही गुरू- सद् गुरू आपल्या शिष्यांना कर्मकांडातच रमवतात. सत्संग शुध्द ज्ञानापर्यंत नेणारा पाहिजे. आपल्या पूर्वापार चालत आलेल्या रूढी, परंपरा आणि कर्मकांड यामध्ये गैरसमजच खुप आहेत. आजच्या खोट्यांच्या बाजारात सर्वसामान्यांना नेमके खरे काय? तेच कळत नाही.

मला सगळे कळते ही महाचूक असते. जे चुकते ते मान्य करणे ही अध्यात्माची पहिली पायरी. आपण कोण? याचे उत्तर शांतपणे पाहिले पाहिजे. ईश्वर प्राप्ती हा मुख्य उद्देश समोर ठेवून प्रपंच नेटका केला की, मग परमार्थ साधावा. संन्यास घेऊन लवकर ईश्वर प्राप्ती करता येईलच, असे नाही! प्रापंचिक माणूस लवकर अध्यात्मिक होऊन ईश्वर प्राप्ती पर्यंत पोहोचतो. संसारात जो राहू शकला तो अध्यात्मिक होण्याची फुल गॅरंटी असते. ईश्वर प्राप्तीसाठी संन्यास घेण्याची अजिबात गरज नाही.

आपले देव आणि गुरू यांच्याबद्दल भिती नव्हे तर आदर, आपलेपणा, प्रेम वाटले पाहिजे. देवांशी आणि गुरूंशी आपल्याला मनमोकळेपणाने बोलता आले पाहिजे. मार्गदर्शन घेता आले पाहिजे. आपल्या तक्रारी घेऊन सद् गुरूंकडे जावू नका. आपल्या संसाराची ओझी सद् गुरूंवर टाकू नका. सद् गुरूंचा उपयोग प्रापंचिक समस्यांची सोडवणूक करून घेण्यासाठी न करता अध्यात्मिक उन्नतीसाठी करा, असे आवाहन श्री.फडके यांनी केले.

# महिलांचा सन्मान केवळ एका दिवसापुरता नव्हे - महापौर

## संघर्ष प्रतिष्ठानतर्फे महिला दिनानिमित्त गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** संघर्ष प्रतिष्ठानच्या वतीने महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गुणगौरव सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला ज्योतीताई गाडे, शितलताई जगताप, किरणताई बारस्कर, अंजली आव्हाड, ज्योतीताई ढवण, प्रणाली सिरसागर, मोनाली बोरुडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महिलांचा सन्मान केवळ महिला दिनापुरता मर्यादित न ठेवता त्यांचा आदर वर्षभर केला पाहिजे. आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. समाजात चांगले काम करणाऱ्या महिलांचा सन्मान केल्यास त्यांना अधिक ऊर्जा आणि प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले.

महापालिकेच्या माध्यमातून शहरात स्वच्छतेबाबत जनजागृती केली जात असून नागरिकांनीही यात सहभाग घेणे गरजेचे आहे. महिलांनी पुढे येऊन आपला कचरा घंटागाडीत टाकण्याचा संकल्प केला, तर शहर कचरा मुक्त होण्यास वेळ लागणार नाही, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शितलताई जगताप म्हणाल्या की, महिलांना समाजात काम करताना अनेक संघर्षांना सामोरे जावे लागते. चांगले कार्य करणाऱ्या महिलांच्या पाठीशी महिलांनीच उभे राहणे आवश्यक आहे. सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी सावित्रीबाई फुले, जिजाऊ, झाशीची राणी, अहिल्यादेवी यांच्या विचारांचे संस्कार पुढील पिढीमध्ये रुजविणे गरजेचे आहे. यामुळे सक्षम पिढी आणि सक्षम राष्ट्र निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले.

किरणताई बारस्कर म्हणाल्या की, आपण सावित्रीबाई आणि जिजाऊ यांच्या लेकी आहोत. त्यामुळे समाजात धाडसाने व आत्मविश्वासाने जगणे आवश्यक आहे. महिलांनी पुढाकार घेऊन समाज घडविण्यासाठी काम करावे. सध्याची युवा पिढी व्यसनाधीनतेकडे वळत असल्याने त्यांना क्रीडा क्षेत्राकडे वळविणे गरजेचे आहे. प्रत्येक विद्यार्थिनीने क्रीडा क्षेत्रातही करिअरच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या सन्मान सोहळ्यामुळे समाजात सकारात्मक कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव झाला असून उपस्थित महिलांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# आडुळ आरोग्य केंद्राचा कारभार ठप्प; रुग्णांची ताटकळ, रुग्णवाहिका बंद

## डॉक्टर अनुपस्थित; १०२ सेवेला डिझेलअभावी ब्रेक, नागरिकांत संताप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** तालुक्यातील आडुळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील ढिसाळ कारभारामुळे रुग्णांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. उपचारासाठी आलेले रुग्ण दोन ते तीन तासांपासून आरोग्य केंद्राबाहेर प्रतीक्षा करत असताना, संबंधित डॉक्टर अनुपस्थित असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, आपत्कालीन सेवेसाठी असलेली १०२ रुग्णवाहिका गेल्या आठ दिवसांपासून डिझेलअभावी बंद असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे गंभीर रुग्णांना तातडीने हलविण्यात अडचणी निर्माण होत असून, आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

स्थानिकांच्या मते, या आरोग्य केंद्रातून रुग्णांना प्राथमिक उपचार देण्याऐवजी थेट इतरत्र ‘रेफर’ करण्याचे प्रकार वाढले आहेत. परिणामी, ग्रामीण भागातील नागरिकांना वेळ आणि खर्च या दोन्हींचा फटका बसत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पैठणमध्ये गॅससाठी ग्राहकांची झुंबड; घरपोच सेवा बंद, एजन्सीसमोर लांबच लांब रांगा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण शहरातील गॅस एजन्सीवर सोमवारीही दिवसभर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. घरपोच सेवा मागील आठ दिवसांपासून बंद असल्यामुळे नागरिकांना स्वतः एजन्सीवर जाऊन सिलिंडर घ्यावा लागत असून, यामुळे मोठी गैरसोय होत आहे.




गॅससाठी सकाळपासूनच ग्राहकांनी एजन्सीसमोर गर्दी केली होती. महिलांसह ज्येष्ठ नागरिकांनाही तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर एजन्सी व्यवस्थापनाने प्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियोजन करत परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. मात्र, घरपोच सेवा बंद असल्याने ग्राहकांची तारांबळ उडत असून, ही सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पाथर्डी– एकनाथवाडी बस सेवा सुरू

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**खरवंडी कासार –** पाथर्डी- एकनाथवाडी राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा सुमारे एक वर्षापासून बंद करण्यात आली होती, यावर ग्रामस्थानी वारंवार मागणी करून देखील बस सेवा सुरू करण्यात आली नाही, १२ मार्च रोजी ग्रामस्थानी २३ मार्च रोजी एन एच ६१ खरवंडी कासार येथे रस्ता रोको करणार असल्याचे निवेदन आगार प्रमुख याना दिले असता २१ मार्च दुपारी राज्य परिवहन



महामंडळाच्या कर्मचऱ्यांनी एकनाथवाडी येथील रस्त्याची पाहणी करुण बस चालु केली. यावेळी सरपंच नंदा बळीराम डोंगरे व उपसरपंच सचिन नामदेव गायकवाड यांनी प्रत्यक्षात बससेवेसाठी आसणाऱ्या अडचणी समजून घेत रस्त्यावरील खड्डे तातडीने दुरुस्त करून घेतले.

गावातील तरुण सरळसेवा, पोलीसभरती, स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी पाथर्डी येथे वास्तव्यास आहेत त्यांच्या जेवणाचा डब्बा गावातून जातो तरी यापुढे बस सेवा सुरळीत सुरू ठेवावी अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने सिद्धार्थ महादेव खेडकर यांनी अधिकाऱ्यांकडे केली.

# डॉ.विखे पाटील इंजिनीअरींग मेकॅनिकल विभागातील २१ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे नोकरीसाठी निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागामार्फत मेकॅनिकल इंजिनीअरींग विद्यार्थ्यांकरीता करीअर घडवण्याच्या दृष्टीने मेकॅनिकल इंजिनीअरींग क्षेत्रातील कंपन्यांद्वारे चतुर्थ वर्ष मेकॅनिकल इंजिनीअरींग विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागातील एकुण २१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

यावेळी मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागातील कु. दिप्ती पानमंद हिचे सीएई एनालायझर, पुणे या मल्टीनॅशनल कंपनीमध्ये निवड झाली. यामध्ये मे, हायटेक, लिस्टारो ग्रुप, पुणे ०४, मे. लॉरेंझ नुडसन, अहिल्यानगर १०,मे.राधेय मशिनरी, पुणे ०९,सीएई एनालायझर प्रा. लि,पुणे-०१, मे.नेलसॉफ्ट प्रा.लि. पुणे-०९ मे. सी.पी.एस.प्रा. लि.पुणे ०८, फ्लेअर एनर्जी०१, के ड्राईव्ह सुपा-०२ मे.सी.जी.पॉवरअहिल्यानगर-०२, या मेकॅनिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा समावेश आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांस प्रत्येकी दोन अशा ४२ ऑफर्स मिळाल्या असून सरासरी तीन ते चार लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज आहे.

या मुलाखतीसाठी विभागीय शिक्षक समन्वयक प्रा. दत्तात्रय नन्नवरे, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा. सुदर्शन दिवटे यांनी परिश्रम घेतले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ.सुशील मगर, प्राचार्य डॉ. रविंद्र नवधर यांनी मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल संस्थेचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनिल कल्हापुरे, डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ. पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील,संस्थेचे चेअरमन तथा जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री अहिल्यानगर डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या व त्यांच्या या यशाचे कौतुक केले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### कॅप्टन खरात मुक्त भारत अंधश्रद्धेविरुद्ध राष्ट्रव्यापी लढ्याची घोषणा

अहिल्यानगर - नाशिक येथील ''कॅप्टन खरात'' प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्राच्या विवेकाला हादरा दिला असून, अंधश्रद्धेच्या नावाखाली समाजात घडणाऱ्या शोषणाचे भीषण वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर ''कॅप्टन खरात मुक्त भारत'' या संकल्पनेतून पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने राष्ट्रव्यापी जनजागृती अभियानाची घोषणा करण्यात आली आहे. ॲड. कारभारी गवळी यांनी या प्रकरणाकडे केवळ एका गुन्हेगाराच्या कृत्याच्या रूपात न पाहता, तो एक व्यापक सामाजिक आजार असल्याचे स्पष्ट केले. ''प्रश्न फक्त त्या व्यक्तीने काय केले याचा नाही, तर समाजाने त्याला अशी संधी का दिली?'' असा मूलभूत प्रश्न त्यांनी उपस्थित केला. विज्ञानाला विरोध करणारे विश्वास, भीतीवर आधारित श्रद्धा, ''देव रागावेल'' या भीतीमुळे प्रश्न न विचारणे, तथाकथित बाबांवर आंधळा विश्वास, तसेच स्त्रिया किंवा काही जाती कनिष्ठ आहेत अशी धारणा या सर्व चुकीच्या माहितीच्या स्वरूपात समाजात खोलवर रुजलेल्या आहेत. ''कॅप्टन खरात''सारखे लोक या श्रद्धा निर्माण करत नाहीत; ते समाजात आधीपासून अस्तित्वात असलेल्या चुकीच्या विश्वासांचा गैरवापर करून समाजातील कमजोर घटकांचे शोषण करतात, असेही गवळी यांनी नमूद केले.जेव्हा समाजात चुकीची माहिती वाढते, तेव्हा विचारशक्ती कमी होते, भीती वाढते, लोक सहज फसवले जातात आणि अन्यायाला खतपाणी मिळते. या प्रक्रियेला 'सामाजिक अराजकता' ( ) असे संबोधले जाते. यामुळे समाजाच्या बौद्धिक क्षमतेचा हळूहळू ऱ्हास होतो. अशा घटनांमध्ये एक ठरावीक पद्धत दिसून येते आधी कमजोर व्यक्तींची निवड, त्यानंतर दैवी शक्तीचा दावा, व्यक्तीला कुटुंब व तर्कशक्तीपासून दूर नेणे आणि शेवटी शोषणाला 'आध्यात्मिक' स्वरूप देणे. समूह दबावाद्वारे विरोध थांबवणे ही त्याची अंतिम पायरी असते. या मोहिमेसाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीरबहाद्दूर प्रजापती, सचिन कुक्कडवाल, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, पोपट भोसले, धनंजय मडके, कैलास पठारे, अशोक भोसले आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

### नेप्तीनाका ते कल्याण रोडवरील उड्डाणपूल व पर्यायी रस्त्यांच्या समस्या तातडीने सोडवा - स्वाती सिरसुल



अहिल्यानगर - नालेगाव परिसरातील नेप्तीनाका चौकाजवळ सीना नदीवरील नवीन उड्डाणपुलाचे काम सध्या गतीने सुरू असले तरी, पर्यायी वाहतूक व्यवस्थेतील त्रुटींमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर अपूर्ण सुविधा तातडीने पूर्ण करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी ठोस मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे. सदर उड्डाणपुलाच्या कामासाठी १६ मार्च ते ३० मार्च या कालावधीत नेप्तीनाका ते कल्याण रोड हा मुख्य रस्ता वाहतूक व पादचाऱ्यांसाठी पूर्णतः बंद करण्यात आला आहे. परिणामी, वाहतुकीचा भार पर्यायी मार्गांवर वळवण्यात आला असून माधवनगरमार्गे वारुळाचा मारुतीकडे जाणारा बायपास रस्ता वापरला जात आहे. मात्र हा रस्ता अत्यंत खराब, खड्डेमय व अरुंद असल्याने वाहनचालकांना कोंडीचा सामना करावा लागत आहे. शिवाय, काही ठिकाणी ओढे-नाले ओलांडून जावे लागत असल्याने पादचाऱ्यांचे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने मुरूम टाकून व खडीकरण करून हा पर्यायी रस्ता किमान तात्पुरता तरी सुस्थितीत करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सीना नदीवरील जुन्या पुलाची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असून अनेक ठिकाणी पडझड झाली आहे. पुलाला कठडे नसल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः रात्री स्ट्रीट लाईटची सुविधा नसल्याने परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरते, त्यामुळे पादचारी व वाहनधारक नदीत पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# अहिल्यानगर प्रज्ञाशोध परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचे यश

### सरफराज शेख जिल्ह्यात प्रथम; ३३ विद्यार्थ्यांची जिल्हा गुणवत्ता यादीत । गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर प्रज्ञाशोध परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाने यंदा अभूतपूर्व यश संपादन करत एकूण ३३ विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पुन्हा शाळेने आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे.

या परीक्षेत सरफराज शाकीर शेख याने ३०० पैकी २८६ गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच अनुष्का विलास धामणे व पार्थ विक्रम जाधव (२७६ गुण) यांनी तिसरा क्रमांक, सर्वेश प्रवीण आव्हाड (२७४ गुण) चौथा क्रमांक, आदित्य अशोक औटी (२७० गुण) सहावा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.

याशिवाय राजनंदनी राहुल गांगर्डे, आस्था निलेश सुंबे, सिद्धवेदाय सचिन पेंडभाजे, वेदांत वैभव राहिंज (प्रत्येकी २६८ गुण) यांनी सातवा क्रमांक, स्वरा सचिन दरेकर (२६६ गुण) आठवा क्रमांक, तर आरोही विजय सोनवणे (२६४ गुण) नववा क्रमांक पटकावला.

तसेच अनुराज संतोषकुमार दराडे व सत्यजित विठ्ठल शिंदे (२६२ गुण) यांनी दहावा क्रमांक, संस्कृती बाबासाहेब कापरे व प्रणव प्रदीप उकांडे (२६० गुण) यांनी अकरावा क्रमांक मिळवला. यासह विराज शिशिर काठमोरे, आर्यन गोरख शेरकर, अधिराज संतोषकुमार दराडे, आरोही अनिल गोसावी, आरोही दिनेश सुंबे, मृणाली भावका उंबरे, गौरी बंडू कोतकर, शिवम सुनील दरेकर, अनुज भाऊसाहेब पवार, स्वरा प्रवीण सुंबे, आरिज जावेद शेख, काव्या महेश बोरुडे, शरयू भालचंद्र जगताप, रुफिन फिरोज तांबोळी, सौम्या रामभाऊ देशमुख, विभा प्रवीणकुमार गायकवाड, श्रीशा प्रदीप तांबोळी, आरुषा ऋषिकेश कारले या विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट कामगिरी करत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत मुख्याध्यापिका सौ. लक्ष्मी आहेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शितल रोहोकले व जयश्री खांदोडे यांनी विशेष परिश्रम घेतले, तर विभाग प्रमुख सौ. उर्मिला साळुंके यांनी संपूर्ण नियोजनाची जबाबदारी सांभाळली.

या यशाबद्दल मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, अर्जुनराव पोकळे, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, लाईफ मेंबर शिवाजीराव लंके तसेच प्राचार्या छाया काकडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# दीनदुबळ्यांची सेवा हाच खरा आदर्श – माजी नगरसेवक दगडू मामा पवार

### राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी अपंग कल्याण केंद्रात स्व. आमदार अरुण काका जगताप यांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी अपंग कल्याण केंद्र, कल्याण रोड येथे स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी दिव्यांग व मतिमंद विद्यार्थ्यांसोबत जयंती साजरी करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना माजी नगरसेवक दगडू मामा पवार म्हणाले की, समाजामध्ये वावरताना प्रत्येकाने समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून काम केले पाहिजे. आपल्या उत्पन्नातून काही रक्कम बाजूला ठेवून दीनदुबळ्यांसाठी खर्च करणे हीच खरी समाजसेवा आहे. दिव्यांग व मतिमंद मुलांची सेवा हीच ईश्वर सेवा आहे, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप यांनी नेहमीच सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून काम केले. त्यांच्या कार्याचा आदर्श प्रत्येकाने अंगीकारणे गरजेचे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या दहा गुंठे जागेमुळे आज या ठिकाणी चांगली शाळा उभी राहिली आहे. त्यांच्या जाण्याला एक वर्ष पूर्ण झाले असले तरी त्यांच्या आठवणी आजही प्रत्येकाच्या मनात जिवंत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास माजी नगरसेवक दगडू मामा पवार, विलास ताठे, योगेश ठुबे, बाळासाहेब निकम, पैलवान गोरख खंडागळे, नगरसेवक रेवणनाथ पवार, दीपक खेडकर, नितीन घोडके, विशाल पटवेकर, ब्रिजेश ताठे, स्वप्निल ताठेड, संजू भुतकर, कान्हा गायकवाड, योगेश आजबे, रोहित भगत, योगेश भुजबळ, कृष्णा वाळुंजकर, सुरज चांदगुडे, सौरभ जरे, दादासाहेब पांडुळे, साहिल चांदगुडे, रोहन दळवी, किरण मेहत्रे, संतोष मगर, सागर नाईकवाडी आदींसह युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी अपंग कल्याण केंद्राच्या वतीने स्व. अरुण काका जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या कार्याची आठवण करण्यात आली. उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांच्या समाजाभिमुख कार्याचा गौरव केला.

नगरसेवक रेवणनाथ पवार म्हणाले की, ''स्वर्गीय अरुण काकांच्या आठवणींनी मन भावूक होते. त्यांचे विचार नेहमीच ऊर्जा व प्रेरणा देणारे होते. प्रत्येक व्यक्तीची आत्मीयतेने विचारपूस करणारे आणि कुटुंबातील सदस्यांशी जिव्हाळ्याने वागणारे ते नेते होते. ते पुढे म्हणाले की, दगडू मामा पवार मित्र मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत दिव्यांग व मतिमंद विद्यार्थ्यांमध्ये जाऊन जयंती साजरी करणे हा सकारात्मक उपक्रम आहे.

# स्व. आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त मूकबधिर विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन

### सामाजिक बांधिलकी जपत उपक्रम; विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त शहरातील आठरे पाटील स्कूल रोड येथील मूकबधिर विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्याचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. साधनाताई बोरुडे यांच्या वतीने आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या प्रसंगी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, किरण बारस्कर, आशाताई निंबाळकर, साधनाताई बोरुडे, नितीन घोडके, दीपक खेडकर, रोहिणी अंकुश, बाळासाहेब बोरुडे, अक्षय बोरुडे, गौरव बोरुडे, संतोष गोरे, धीरज परदेशी, अक्षय मुळे, विजय गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना साधनाताई बोरुडे म्हणाल्या की, स्वर्गीय अरुण काका जगताप यांनी सर्वांना बरोबर घेऊन सामाजिक बांधिलकी जपत चांगला समाज घडविण्याचे काम केले. त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, त्यांचे विचार पुढे नेण्याचा प्रयत्न आम्ही करत राहू आणि समाजासाठी सकारात्मक कामे करत राहू.

या उपक्रमाद्वारे स्व. अरुण काका जगताप यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला.

# शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना दिली जाणारी सेवा कौतुकास्पद– दिपक बोथरा

### आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या अस्थिरोग तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणावर आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते.या शिबिरामध्ये सहभागी होण्याची संधी बोथरा परिवाराला मिळाली हे आमचे भाग्य समजतो. आनंदऋषिजी हॉस्पिटल ने सर्वसामान्य रुग्णांना शिबिराच्या माध्यमातून अत्यल्प दरात व मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे.या आरोग्य सेवेचा लाभ हजारो लोकांना मिळत आहे. आरोग्य सेवेपासून कोणताही रुग्ण वंचित राहू नये,यासाठी जैन सोशल फेडरेशन चे सर्व सदस्य अत्यंत तळमळीने रुग्णसेवेचे कार्य करीत आहे.सध्याच्या काळात न परवडणारा औषध उपचाराचा खर्च यामुळे अनेक रुग्ण उपचारापासून वंचित राहतात.शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना दिली जाणारी सेवा कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन उद्योजक दिपक बोथरा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोफत अस्थिरोग तपासणी शिबिराचे आयोजन रमेशजी,दीपकजी बोथरा परीवार(मे.ताराचंद हंसराज बोथरा)यांच्यावतीने करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन उद्योजक रमेश,दिपक बोथरा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले.याप्रसंगी सौ. ज्योती बोथरा,श्रीमती कुसुम बोथरा,सौ.अनिता बोथरा, सौ.अमृता बोथरा,राजेंद्र बोथरा, सतीश बोथरा,अशोक बोथरा, प्रकाश बोथरा,निखिल बोथरा, उत्कर्ष बोथरा,सुरेश बोथरा, अजय बोथरा,किशोर बोथरा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ. प्रकाश कांकरिया,डॉ.वसंत कटारिया, डॉ. आशिष भंडारी,माणकचंद कटारिया, वसंत चोपडा,प्रकाश छल्लाणी,अस्थिरोग तज्ञ डॉ. विशाल शिंदे,डॉ.रोहन धोत्रे,स्पाइन सर्जन डॉ.अमित सुराणा,डॉ.अक्षय गादिया, डॉ. श्रीकांत दलाल, फिजिओथेरपीस्ट डॉ. अनुजा शिवणेकर देशपांडे, डॉ.आराधना अरवडे,डॉ.अभय साठे,डॉ.कुमार आदी उपस्थित होते.

प्रास्तविकात डॉ.वसंत कटारिया म्हणाले,रमेश बोथरा,दीपक बोथरा व बोथरा परिवाराचे दरवर्षी शिबिराच्या माध्यमातून सहकार्य मिळत असते.बोथरा परिवार हा अत्यंत धार्मिक असल्याने व हॉस्पिटलच्या सेवा कार्यावर त्यांची नितांत श्रद्धा असल्याने शिबिराच्या माध्यमातून सेवा कार्यात त्यांचा सहभाग लाभत असतो. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी. यासाठी मोठ्या प्रमाणात शिबिराचे आयोजन करण्यात येते.गुडघा प्रत्यारोपण व खुबा प्रत्यारोपण,सांधे बदली शस्त्रक्रिया या अत्यंत महागड्या शस्त्रक्रिया आहेत.या अस्थिरोग तपासणी शिबिरात यासारख्या शस्त्रक्रिया सवलतीच्या व अत्यंत माफक दरात उपलब्ध करून दिल्या जात आहेत. अस्थिरोग विभागामध्ये डॉ.विशाल शिंदे व डॉ.रोहन धोत्रे यांच्यासारखे अनुभवी डॉक्टर्सची टिम येथे कार्यरत आहे.

# लोडशेडिंगविरोधात खासदार निलेश लंके यांचे ठिय्या आंदोलन; महावितरणला थेट इशारा

### सायंकाळची वीज कपात तात्काळ थांबवा, अन्यथा कार्यालय बंद करू शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या प्रश्नांवरून तीव्र संताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यात सुरू असलेल्या सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंतच्या लोडशेडिंगविरोधात खासदार निलेश लंके यांनी महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले. वाढत्या वीज कपातीमुळे शेतकरी, विद्यार्थी व महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करत त्यांनी लोडशेडिंग तात्काळ बंद करण्याची मागणी केली.

महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करताना खासदार लंके यांनी स्पष्ट इशारा दिला की, सायंकाळच्या वेळेतील लोडशेडिंग तात्काळ बंद करा, अन्यथा महावितरणचे कार्यालय बंद करण्यास भाग पाडू.

यावेळी नाशिक विभागाचे अधीक्षक अभियंता सुंदर लटपटे यांच्याशी त्यांनी सविस्तर चर्चा केली. या आंदोलनात जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब हराळ, प्रा. सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, श्रीकांत जगदाळे, अमोल खाडे, एकनाथ गांगर्डे, भाऊसाहेब काळे, पोपट पुंड, उद्योजक अल्ताफ शेख यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

खासदार निलेश लंके यांनी सांगितले की,

''लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहेत, त्यामुळे त्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे. तसेच महिलांच्या स्वयंपाकाच्या वेळेत वीज नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. ग्रामीण भागात बिबट्याच्या भीतीमुळे अंधारात राहणे धोकादायक ठरत आहे.

ते पुढे म्हणाले की, या प्रश्नावर अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाली असून दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. आरडीसी योजना पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर २४ तास वीज पुरवठा शक्य होईल.सरकारवर टीका करत त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, लोडशेडिंग करून शेतकऱ्यांची मुले गुरांमागे पाठवायची का? त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवायचे का?

दरम्यान, अधीक्षक अभियंता सुंदर लटपटे यांनी सांगितले की, वीज चोरी हा गंभीर प्रश्न असून तो नियंत्रणात आल्यानंतर २४ तास वीज पुरवठा देणे शक्य होईल. शक्य तितक्या प्रमाणात लोडशेडिंग कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. यावेळी जिल्ह्याचे अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवारही उपस्थित होते.

# १ कोटी ८४ लाखांच्या विकासकामांनी जामगावला नवी दिशा

### आमदार काशिनाथ दातेंच्या माध्यमातून विकासाला वेग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते जामगाव, ता. पारनेर येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण समारंभ उत्साहात पार पडला. सुमारे १ कोटी ८४ लाख रुपयांच्या निधीतून रस्ते व पायाभूत सुविधांच्या कामांना प्रारंभ झाल्याने गावाच्या विकासाला नवे बळ मिळाले आहे.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष वसंत चेडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, उद्योजक दिलीप दाते, सरपंच बाळासाहेब माळी, बाळासाहेब सोबले, सिताराम खोडाळ, बबन पवार, मिनिनाथ शिंदे, प्रसाद मेहेर, समीर मांढरे, मनोज शिंदे, दिनकर सोबले, त्रिंबक पवार, बबन मेहेर, बाबाजी महांडुळे, रमेश आबुज, जालिंदर मेहेर, अरुण धुरपते, रोहीत शिंदे, सागर बर्वे, दत्तात्रय बांगर यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या निधीतून गावातील प्रमुख अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, डांबरीकरण, तसेच विविध वस्ती व शिवार रस्त्यांचे मजबुतीकरण व सुधारणा करण्यात येणार आहे. यामध्ये डिकसळ शिवसोबले बारव जुना पारनेर रस्ता, भांडगाव रस्तामेहर वस्ती रस्ता, पारनेर रस्ताशिंदे वस्ती रस्ता, कावरे मळा रस्ता कॉक्रीटीकरण, जिजाबापू औटी वस्ती ते पाडळी शिवरस्ता, तसेच मुंजाळ दरा ते बैलटेक वस्ती रस्ता कॉक्रीटीकरण, बांगरवाडी व हिलाळ वस्ती परिसरातील रस्ते सुधारणा व मळगंगा परिसर कॉक्रीटीकरण अशा विविध कामांचा समावेश आहे. याशिवाय काही ठिकाणी नवीन रस्ते खडीकरण व कॉंक्रीटीकरणाद्वारे विकसित करण्यात येणार आहेत.

यावेळी बोलताना आमदार दाते म्हणाले की, ''पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्य व मार्गदर्शनामुळे मतदारसंघात रस्त्यांचे मजबूत जाळे उभारण्यात यश आले असून आज भुमिपूजन व लोकार्पण होत असलेल्या या रस्त्यांच्या विकासकामांमुळे ऐतिहासिक जामगावची नवी ओळख निर्माण होणार असून दळणवळण अधिक सुलभ होईल. गावातील नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुरक्षित व सुलभ करण्यासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून हा निधी मंजूर करण्यात आला आहे. हे पाऊल जामगावच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल.'' या विकासकामांमुळे जामगावच्या प्रगतीला नवी गती मिळणार असल्याने स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# महिला ही देशाच्या प्रगतीची गुरुकिल्ली - महापौर ज्योती गाडे

## बुरुडगाव रोड साई उद्यान येथे जिजाऊ महिला प्रतिष्ठानचा 'होम मिनिस्टर' कार्यक्रम उत्साहात




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महिला दिनानिमित्त बुरुडगाव रोड येथील साई उद्यान येथे जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या वतीने 'होम मिनिस्टर' कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून विविध उपक्रमांच्या माध्यमातून महिलांना आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळाली.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या शिक्षणाची दारे खुली करून दिल्यामुळे आज महिला सर्वच क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. ''महिला ही फक्त कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण देशाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

त्या पुढे म्हणाल्या की, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सहकार्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. जिजाऊ मासाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले, त्याचप्रमाणे प्रत्येक महिलेने आपल्या घरातील मुलांना घडविण्याची जबाबदारी पार पाडावी. महिला जितक्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, तितक्या देशाच्या प्रगतीला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या माध्यमातून प्रभागामध्ये राबविण्यात येणारे वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, गणेश विसर्जन व्यवस्थापन तसेच अभ्यासिका यांसारखे उपक्रम शहरासाठी दिशादर्शक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. जिजाऊ महिला प्रतिष्ठान गेल्या सात वर्षांपासून महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करून महिलांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, माजी नगरसेविका शितलताई जगताप, जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा संगीता भोसले, नगरसेविका सुनिता फुलसौंदर, अलका मुंदडा, मनीषा भागानगरे, कोमल चोपडा, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संतोष भोसले, सुनील भोसले, विजय फुलसौंदर आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

माजी नगरसेविका शितलताई जगताप म्हणाल्या की, होम मिनिस्टर कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला एकत्र येऊन आपल्या कलागुणांना वाव देतात. या कार्यक्रमातून विचारांची देवाण-घेवाण होते आणि महिलांना आनंददायी वातावरण मिळते.

जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा संगीता भोसले म्हणाल्या की, महिला दिन दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून महिलांचा सहभागही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी सांगितले की, प्रभागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेमध्ये मोफत क्लास सुरू करण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा.

# शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त मनपाकडून अभिवादन

## क्रांतिकारकांच्या बलिदानाची प्रेरणा नव्या पिढीला – महापौर ज्योतीताई गाडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने थोर क्रांतिवीर शहीद भगतसिंग, शहीद सुखदेव व शहीद राजगुरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी देशासाठी बलिदान देणाऱ्या या क्रांतिकारकांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांचे कार्य व विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला.

कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहेर लहारे, शेखर देशपांडे, राजेश लयचिट्टी, अनिल लोंढे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान हे अमूल्य आहे. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. त्यांच्या विचारांमधून तरुणांनी प्रेरणा घेऊन देशाच्या विकासासाठी योगदान द्यावे.

त्या पुढे म्हणाल्या की, देशप्रेम, त्याग व समर्पण या मूल्यांची जपणूक करणे ही आजच्या काळाची गरज आहे. क्रांतिकारकांनी दाखविलेल्या मार्गावर चालत समाजहिताचे कार्य करण्याची प्रेरणा प्रत्येकाने घ्यावी.

यावेळी उपस्थित मान्यवरांनीही क्रांतिकारकांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

# महापौर व उपमहापौरांकडून मनपा बजेटचा आढावा; अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

## उत्पन्न वाढ, निधी व नागरिक सुविधा यावर भर; विविध सूचनांचा वर्षाव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सन २०२६ च्या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची सभा दि. २५ मार्च रोजी आयोजित करण्यात आली असून त्या पार्श्वभूमीवर महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर आढावा बैठक घेतली. या बैठकीत बजेटमधील विविध तरतुदींवर चर्चा करत महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहेर लहारे, उपायुक्त तडवी, शहर अभियंता मनोज पारखे, नगररचनाकार यादव, अभियंता वैभव जोशी, श्रीकांत निंबाळकर, आदित्य बल्लाळ, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

बैठकीत महापौर व उपमहापौर यांनी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी विविध उपाययोजना राबविणे अत्यंत गरजेचे असल्याचे स्पष्ट केले. महसूल वाढीवर विशेष भर देत आर्थिक शिस्त व नियोजनाची गरज अधोरेखित करण्यात आली.

शहरातील विविध विकासकामांसाठी निधीचा प्रभावी वापर करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तीची मानधनावर नियुक्ती करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच शहरातील ओढे-नाल्यांच्या सुशोभीकरणासाठी निधीतून प्रयत्न करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शहरातील प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये नागरिकांसाठी बसण्याची योग्य व्यवस्था करण्यात यावी, तसेच महापालिकेच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती टीव्हीच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवावी, अशा सूचना देण्यात आल्या. यामुळे प्रशासन व नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार असल्याचे सांगण्यात आले.

महानगरपालिकेची गेल्या एक वर्षापासून पडून असलेली शववाहिका कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासोबतच नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेची स्वतंत्र ॲम्बुलन्स सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबतही चर्चा झाली.

# काचबिंदू निर्मूलनासाठी सावेडीत जनजागृती रॅली

## अहिल्यानगर ऑप्टॅनिक अकॅडमीचा उपक्रम; नेत्रतज्ञांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** काचबिंदू निर्मूलन सप्ताहाच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्हा ऑफ्थालमिक् अकॅडमीच्या वतीने सावेडी परिसरात जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अंतर्गत प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून काचबिंदू जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष डॉ. रावसाहेब बोरुडे व सचिव डॉ. राजीव चिटगोपेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या रॅलीत शहरातील सर्व नेत्रतज्ञांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी काचबिंदू या 'नि:शब्द अंधत्वा'बाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

याप्रसंगी डॉ. प्रकाश रसाळ, डॉ. महाडिक अशोक, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधीर इंगळे, डॉ. कापसे प्रमोद, डॉ. प्रसन्न खणकर, डॉ. दिलीप फलके, डॉ. अनिल सिंग, डॉ. रोहित थोरात, डॉ. शैलेंद्र पोतनीस, डॉ. शिल्पा खंडेलवाल आदींसह अनेक नेत्रतज्ञ उपस्थित होते. यावेळी डॉ. बोरुडे व



डॉ. चिटगोपेकर यांनी सांगितले की, राज्यभर २२ मार्चपासून सात दिवस 'काचबिंदू सप्ताह' राबविण्यात येत असून त्याअंतर्गत विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या सप्ताहात मोफत नेत्र तपासणी शिबिरे, काचबिंदूबाबत समज-गैरसमज दूर करण्यासाठी मार्गदर्शन सत्रे तसेच उपचार पद्धतींबाबत माहिती देणारी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. नागरिकांनी वेळोवेळी नेत्र तपासणी करून काचबिंदूचा धोका टाळावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# सक्षम निर्णय, सकारात्मक विचार व धाडसी कर्तव्य यशाची त्रिसूत्री - दत्तात्रय वारकड

## अहिल्या नगर पोलीस मुख्यालयात 'आनंदी जीवन आयुष्याचा आनंद उत्सव' कार्यक्रम उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा पोलीस अधीक्षक माननीय श्री सोमनाथ घार्गे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस मुख्यालय, अहिल्या नगर येथे ''आनंदी जीवन आयुष्याचा आनंद उत्सव'' या व्यक्तिमत्व विकास विषयावरील विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात लेखक व प्रेरणादायी वक्ते श्री दत्तात्रय वारकड यांनी उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी पीआय श्री उमेश परदेशी, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री विजय भोसले तसेच विविध पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचारी, आरसीएफ फोर्स व क्यूआरटी फोर्समधील पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्याच्या धावपळीच्या व स्पर्धात्मक युगामध्ये मानव आपले अस्तित्व टिकवण्यासाठी सतत धडपड करत आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती, डिजिटल युग, एआय आणि सोशल मीडियाचा वाढता



प्रभाव यामुळे जीवन अत्यंत वेगवान झाले आहे. मात्र या वेगवान जीवनशैलीत मनः शांती, समाधान आणि आनंद लोप पावत चालल्याचे वास्तव आहे. अशा परिस्थितीत मानसिक सुख, शांती आणि आनंदी जीवन कसे जगावे, याविषयी श्री वारकड यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

समाजात कायदा व सुव्यवस्था राखताना पोलीस अधिकारी व कर्मचारी तन, मन आणि धन अर्पण करून कार्यरत असतात. या जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांना ताणतणाव, मानसिक दडपण आणि कुटुंबासाठी वेळ न मिळण्यासारख्या अडचणींना सामोरे जावे लागते. अशा वेळी संयम, सकारात्मकता आणि शांत मन ठेवणे किती आवश्यक आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

श्री वारकड यांनी संत, महंत, शूरवीर व समाजसुधारकांच्या जीवनातील उदाहरणे देत उपस्थितांशी दिलखुलास संवाद साधला. तसेच ताणतणावातून मुक्त होऊन आनंदी जीवन जगण्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स दिल्या. दररोज १५ ते २० मिनिटे ध्यान करणे, सकारात्मक पुस्तकांचे वाचन, निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवणे, सकारात्मक विचारांचे चिंतन व मनन करणे यामुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो, असे त्यांनी सांगितले.

रात्री झोपण्यापूर्वी व सकाळी उठल्यानंतर १५ ते २० मिनिटे सकारात्मक वाचन केल्यास जीवनाकडे पाहण्याची दृष्टी सकारात्मक बनते. ''आपण आज जे काही आहोत ते आपल्या विचारांमुळेच आहोत'' असे स्पष्ट करत त्यांनी विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. ''विचार जीवनावर आणि कल्पना जगावर राज्य करतात'' असे सांगत त्यांनी विमान, दूरध्वनी, मोटार वाहन यांसारख्या शोधांचे मूळ विचारांमध्येच दडलेले असल्याचे नमूद केले.

जीवनातील सर्व यशाचा पाया सकारात्मक विचारांमध्ये आहे. त्यामुळे नकारात्मकतेपासून दूर राहून सकारात्मकतेकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ज्ञानेश्वरीतील ध्यानयोगाचे महत्त्व स्पष्ट करत त्यांनी ''विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले, अवघेचि जाहले देह ब्रह्म'' या उक्तीचा उल्लेख केला आणि अंतर्मनाच्या शक्तीची जाणीव करून दिली.

# आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त शनिवारी अहमदनगर मर्चंटस बँक प्रायोजित भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त शनिवार दि. २८ मार्च २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत आनंदधाम भक्त निवास येथे सदर शिबीर होणार आहे. श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, श्री तिलोक आनंद मानवसेवा केंद्र, अहिल्या नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिराचे मुख्य प्रायोजक अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँक (शेड्युल्ड बँक) आहे.

या शिबिराचे उद्घाटन शनिवारी सकाळी ८.३०. वाजता होईल. कार्यक्रमाचे अध्यक्ष जैन धार्मिक परीक्षा बोर्डाचे अध्यक्ष नेमीचंद चोपडा (पाली, राजस्थान) असतील तर उद्घाटन अहमदनगर मर्चंटस बँकेचे संस्थापक चेअरमन तथा धार्मिक परीक्षा बोर्डाचे उपाध्यक्ष हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी आ. संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, मनपाचे आरोग्याधिकारी डॉ. सतीश राजूरकर, मर्चंटस बँकेचे व्हाईस चेअरमन व



सर्व संचालक , नगरसेविका मीनाताई चोपडा, नगरसेवक गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, नगरसेविका अनिता शेटिया, नगरसेविका सुनिता फुलसौंदर आदी उपस्थित राहणार आहेत.

आचार्यश्रींना अभिप्रेत मानवसेवा हे उद्दिष्ट समोर ठेवून दरवर्षी २८ मार्च रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. यात दरवर्षी विक्रमी संख्येने रक्तदान होते. यांत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. जास्तीत जास्त भाविकांनी रक्तदान करावे यासाठी तीन महिने आधी मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचेही आयोजन करून हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. भाविक दरवर्षी मोठ्या संख्येने रक्तदान करून आचार्यश्रींच्या स्मृतीस अभिवादन करतात. याही वर्षी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करून शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन धार्मिक परीक्षा बोर्डाचे मानद मंत्री संतोष बोथरा, सह मानंद मंत्री सागर गांधी, संयोजक डॉ. विजय भंडारी, आनंदराम मुनोत यांच्यासह श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, श्री तिलोक आनंद मानवसेवा केंद्र व अहमदनगर मर्चंटस बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

(पान १ वरून)

## बालिकेवर अत्याचार प्रकरणी नराधमास आजन्म कारावास

चालला. हा नराधम गुन्हा घडल्यापासून तुरुंगात आहे. सदर खटल्यात सरकार पक्षाच्या वतीने एकूण १८ साक्षीदार तपासण्यात आले. त्यात पीडिता, तिची आई व वैद्यकीय अधिकारी व रासायनिक विश्लेषक यांच्या साक्षी महत्वपूर्ण ठरल्या. साक्षीदारांचा आलेला पुरावा व युक्तिवाद ग्राह्य धरून विशेष पोक्सो तसेच न्यायाधीश क्र. ६ श्री. डॉ. यु. जे. मोरे यांनी आरोपीस भादंवि. कायद्याचे कलम ३७६ , ३६३,३७७, ३५४ () व ५०६ व पोक्सो कलम ४,६,८ व १२ अन्वये दोषी धरले. सदर खटल्याचे कामकाज अतिरिक्त सरकारी अभियोक्ता राजेश. आर. त्रिमुखे यांनी पाहिले. त्यांना सपोनि संजय चव्हाण, पैरवी अधिकारी पोकॉ आर. डी. आडसुळ, पोकॉ याकुब अहमद सय्यद तसेच हवालदार सचिन डमाळ यांनी सहकार्य केले.

निर्दयपणे स्वातंत्र्य हिरावले गेले.

## गॅस रिफिलिंगच मोठ रॅकेट उघड; चार आरोपी जेरबंद

आरोपी सचीन आबा भोसले वय ३१, रा. दहिवडी, ता. तुळजापूर, जि. धाराशीव),माणिक बालाजी गुट्टे (वय ३२, रा. दैठणे, ता. परळी, जि. बीड),उल्हास जीवन कवडे (वय ३२, रा. कन्हेरवाडी, ता. कळंब, जि. धाराशीव),अमृत बाळासाहेब ठोकळ (वय ३३, रा. कामरगाव, ता. जि. अहिल्यानगर) या कारवाई दरम्यान ५७ टन गॅस, तीन गॅस टँकर, सिलेंडर, टेम्पो आणि अन्य साहित्य असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आले असून या प्रकरणी विविध कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे या रॅकेटमध्ये अजून लोक आहेत याचा तपास पोलीस करीत आहेत.

## केडगाव अवैध गॅस रिफिलिंगची चौकशी करून दोषींवर कारवाई करा – आमदार काशिनाथ दाते

विशेष पथके तयार करण्यात आली असून अवैध गॅस व इंधन व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सातत्याने कारवाई सुरू आहे. संबंधित कायद्यांनुसार पुढील कठोर कारवाई करण्याबाबतही विचार सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र पोलिसांचा थेट सबंध आहे किंवा काय याचा शोध घेतला जाईल. आमदार काशिनाथ दाते यांनी या चर्चेतून अवैध गॅस रिफिलिंगसारख्या धोकादायक प्रकारांवर कठोर नियंत्रण ठेवण्याची गरज अधोरेखित करत, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने अधिक दक्ष राहावे, अशी ठाम भूमिका मांडली.

## सचिन दिनकर विरोधात लाचप्रकरणी गुन्हा दाखल

पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २१२/२०२६ नोंदविण्यात आला आहे. तपास अधिकारी म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे काम पाहत आहेत. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील संतोष शिंदे, रविंद्र निमसे, बाबासाहेब कराड, हारून शेख आदींनी केली आहे.

## डॉ. सुजय विखे यांनी बहरीनमध्ये अडकलेल्या कुटुंबाला सुखरूप आणले मायदेशी

मायदेशी परतले आणि पुढे अहिल्यानगर येथे पोहोचले. या संपूर्ण प्रक्रियेत डॉ. सुजय विखे पाटील यांनी घरच्या व्यक्तीप्रमाणे काळजी घेत मदत केल्याने जठार कुटुंबाने त्यांचे विशेष आभार मानले आहेत. दरम्यान, आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे तणावाचे वातावरण असून अनेक ठिकाणी एअरस्पेस बंद, सुरक्षा अलर्ट व प्रवासावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर परदेशात असलेल्या भारतीय नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासन सतर्क आहे. अशा कठीण परिस्थितीत वेळेत समन्वय साधून जठार कुटुंबाला मायदेशी आणण्यात यश आल्याने डॉ. सुजय विखे पाटील यांच्या तत्परतेचे विशेष कौतुक होत आहे.

## अहिल्यानगर मनपाकडून 'टीबी मुक्त भारत' अभियानाचा शुभारंभ; जनजागृती रॅलीने दिला संदेश

उपचार केले जातील. तसेच निक्षय पोषण योजनेअंतर्गत 'निक्षय मित्र' नोंदणी करून क्षयरुग्णांना दत्तक घेण्याची योजना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. लोकसहभागातून क्षयरोग निर्मूलन शक्य असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी सांगितले की, या मोहिमेअंतर्गत संशयित रुग्णांचे छातीचे एक्स-रे, थुंकी नमुन्यांची तपासणी, तसेच मधुमेह व रक्तदाब तपासणी केली जाणार आहे. त्याचबरोबर नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. आजच्या रॅलीचा उद्देशही जनतेमध्ये क्षयरोगाबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे, असे त्यांनी नमूद केले.

टीबी मुक्त भारत अभियानामध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेने सक्रिय सहभाग घेतला असून शहरातील बहुतांश नागरिकांची आरोग्य विभागामार्फत तपासणी करण्यात येणार आहे. नागरिकांचे आरोग्य सदृढ व निरोगी ठेवण्यासाठी विविध आरोग्य उपक्रम राबविले जातील. महापालिकेच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे मत महापौर ज्योतीताई गाडे यांनी व्यक्त केले.

## रसिक ग्रुपच्या उपक्रमांमुळे नगरची वाटचाल सांस्कृतिक शहराकडे – विशेष पोलीस महानिरीक्षक कराळे

रसिक गौरव हे पुरस्कार देत आहे. पुरस्कार्थींना देण्यात आलेल्या मानपत्रांचे वाचन विनिता गुंदेचा यांनी केले. या समारंभांचे नियोजन रसिक ग्रुपचे तेजा पाठक, सुदर्शन कुलकर्णी, दिपाली देऊतकर, निखिल डफळ, समीर पाठक, प्रशांत अंतापेलू, श्रीकृष्ण बारटक्के, स्नेहल उपाध्ये, प्रसन्न एखे, बाळकृष्ण गोटीपामुल, तुषार बुगे, मीनाक्षी पाटील, नंदकुमार येलुलकर, ऋषिकेश येलुलकर, ओंकार अंतापेलु आदींनी केले.